# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. २००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०४/२०१८

**१) विवाहीतेला शारीरीक व मानसिक त्रास देवुन लाखडी दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०४/२०१८ चे ११.१५ वाजता यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन आरोपीने लग्न झाल्यापासुन पत्नीस शारीरीक व मानसिक त्रास देत होता, आरोपीने फिर्यादी राहत असलेल्या वडीलाचे घरात प्रवेश करुन फिर्यादीस काही न बोलता अचानक फिर्यादीचे डोक्यावर, हातावर लाखडी दांडयाने मारुन जखमी केल्याने फिर्यादीची आई व वडील आडवे झाले असता त्यांना सुध्दा पितळी गुंडाने व विटाने हाता पायावर मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४९८(अ)४५२,३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेश्राम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन बिना पास परवाना अवैध रेतीची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/०४/२०१८ चे ०३.०० वाजता यातील आरोपी क्र. १ याने आरोपी २ चे सांगने वरुन त्याचे मालकीचे ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ५३५९ च्या टॉली मध्ये भागळी नदीचे पात्रातील १ ब्रास रेती किंमती १,०००/—रु. ची बिना पास परवाना चोरुन वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना मातेरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मुंजुमकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) कमी व्याजाच्या कर्जाचे आमीष दाखवुन खोटे कागदपत्रे व खोटया सहया करुन पैश्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०१/०३/२०१८ ते १७/०४/२०१८ पर्यत यातील फिर्यादीस कमी व्याज कर्जाचे आमिष दाखवुन फिर्यादी व त्याचे पत्नीला मोबाईल क्र. ७०६५९९२८९३,९९११६५१९७०,९७१८२३८८६३,७८४०८२४९३९ चे धारकांनी वारंवार आरटीजीएस कॅनरा बॅक ब्रॅन्च नोयडा खाते क्र. ११७७२०१००४९२१ आयएफएसी कोड कॅनरा बॅकब्रॅन्च नोयडा खाते क्र. ७११४२०११०००१४७७ आयएफएससी कोड बीआरआयडी ०००७११४ मध्ये एकुण रक्कम १,८७,०००/—रु जमा करवुन खोटे कागदपत्रे तसेच खोटया सहया करुन फसवणुक केल्याने फिर्यादी अशोक संभाजी नंदेश्वर वय ५७ वर्ष, रा. बारव्हा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४२०,४६७,४६८,४७१,३४ भादवी. सहकलम ७४, ६६(ड),८४(क)आयटी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) अज्ञात वाहन चालकांच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक १८/०४/२०१८ चे १९.४० ते २०.०० वाजता यातील जखमी सुनील एकनाथ मोहरकर वय ५० वर्ष, रा. जुनोना हे पवनी येथुन त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३५ सी १२३५ ने आपले गावी जुनोना येथे जात असता सिंधुपरी कडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन यातील जखमीचे मोटार सायकलला वैनगंगा नदीचे पुलीयाचे मधोमध पवनी येथे धडक मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी ज्ञानेश्वर विठ्ठल पंचभाई वय ४५ वर्ष, रा. येनोळा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) महीन्द्रा गाडीच्या धडकेत एकाचा मृत्यु :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे २१.४५ ते २२.०० वाजता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, व निष्काळजीपणे चालवुन हिरो होंडा स्प्लेन्डर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ४० व्ही ३८०० ला शिवनी बांध शिवार राज्य मार्ग येथे धडक मारल्याने त्यावरील एक अनोळखी इसमाचे मरणास कारणीभुत झाला व दुसऱ्या अनोळखी इसमास गंभिर जखमी करुन अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी गायधने यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट मेमो वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४(अ)(ब),१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) कॅन्सरचे आजाराला कंटाळुन वृध्द महिलेने विहीरीत ऊडी घेवुन आत्महत्या केल्याने मर्ग नोंद :–**

दिनाक १८/०४/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. धुरपता उर्फ मंजुळा नामदेव लुटे वय ७० वर्ष, रा. आमगाव ही २ वर्षा पासुन कॅन्सरचे आजाराने त्रस्त होती १ वर्षापुर्वी तीचे कॅन्सरचे ऑपरेशन नागपुर येथे झाले होते, तेव्हा पासुन तीला जेवन करतांनी त्रास होत होता, त्यामुळे ती चिंतेत राहत होती, तीने आपले घरा समोरील जिल्हा परीषद शाळेच्या आवारातील विहीरीत कॅन्सरचे आजाराला कंटाळुन विहीरीत ऊडी घेवुन आत्महत्या केल्याने फिर्यादी विजय नामदेव लुटे वय ४३ वर्ष, रा. आमगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत

**७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १८/०४/२०१८ चे ११.४० ते १२.४० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो जुना बसस्टॉप तुमसर येथे नागरीकांचे वैयक्तीक सुरक्षेला धोका होईल असे रोडाच्या मधोमध ऊभे करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. धावडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक १८/०४/२०१८ चे १२.४० ते १३.४० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो जुना बसस्टॉप तुमसर येथे नागरीकांचे वैयक्तीक सुरक्षेला धोका होईल असे रोडाच्या मधोमध ऊभे करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. धावडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**क)** दिनांक १८/०४/२०१८ चे १३.४५ ते १४.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो बावणकर चौक तुमसर येथे नागरीकांचे वैयक्तीक सुरक्षेला धोका होईल असे रोडाच्या मधोमध ऊभे करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. धावडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**८) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १८/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, वरठी, सिहोरा, आंधळगाव, साकोली, लाखनी, पवनी, लाखांदुर भंडारा व जवाहरनगर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९६ लिटर हातभंट्टी दारू + ९९० किलो सडवा मोहा+ साहित्य किंमती ५६,५६०/रु. व ०४ लिटर ५०० मिली लिटर देशी दारु किंमती १,५००/–रु. तसेच जुगारातुन ५६४६/रु. असा एकुण किंमती ६३,७०६/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १८/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०९, तीन सिटर वाहनाकरीता– ११ ईतर वाहनांवरती – ८३ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**महिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.